जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -३७१ दिनांक -१०/०९/२०२४**

दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक १, गुन्हे शाखा,पुणे शहर

## सात वर्षापासुन खुनाच्या गुन्ह्यातील फरारी आरोपीच्या आवळल्या मुसक्या

पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे गुन्हे अभिलेखावरील तसेच चतुःश्रुंगी पोलीस स्टेशन, पुणे शहर कडील गुन्हा रजि नं ४८२/२०१७, भा.दं.वि.कलम ३०२,३०७,५०४ या गुन्हयातील तसेच चतुःश्रुंगी पो.स्टे.कडील इतर चार गुन्हयातील फरार आरोपी नामे **सुनिल लक्ष्मण पवार,वय ३४ वर्षे,रा.सोमनाथ मंडळाजवळ, लालचाळ झोपडपट्टी,गोखलेनगर,पुणे** हा गुन्हा,केल्यापासून गेले ७ वर्षे तो फरार होता मा.न्यायालयाने त्याचे अटकेबाबत स्टँडींग वॉरंट काढुन सुध्दा तो मा.न्यायालयात हजर झाला नाही. त्यानंतर मा.न्यायालयाने त्यास फरार घोषित केले होते.

त्याअनुषंगाने दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक १ गुन्हे शाखा,पुणे शहर कडील पोलीस अंमलदार बाळु गायकवाड व महेश पाटील यांना वरील गुन्हयातील व मा.न्यायालयाने घोषित केलेला फरार असलेला आरोपी नामे सुनिल लक्ष्मण पवार हा मांडवी पाडा,काशिगाव,ता,जि.ठाणे येथे स्वतःचे अस्तित्व लपवुन राहत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.

त्याप्रमाणे मा. वरिष्ठांच्या आदेशानुसार पथकाकडील सहा.पोलीस निरीक्षक प्रविण काळुखे,पोलीस अंमलदार गायकवाड,महेश पाटील व साईकुमार कारके असे मांडवी पाडा,काशिगाव,ता,जि.ठाणे येथे वेशांतर करुन सापळा रचून ०७ वर्षापासुन भा.द.वि.कलम ३०२,३०७,५०४ या गुन्हयात फरारी व रेकॉर्डवरिल असलेला आरोपी नामे सुनिल लक्ष्मण पवार, वय ३४ वर्षे,रा.सोमनाथ मंडळाजवळ,लालचाळ झोपडपट्टी, गोखलेनगर,पुणे हा पळुन जात असताना त्यास पाठलाग करुन पकडुन त्यास ताब्यात घेतले व त्याचेकडे चौकशी करता तो यापुर्वी छत्रपती संभाजीनगर,रांजणगाव असे वेगवेगळया ठिकाणी स्वतःचे नाव बदलुन रहात असलेबाबत सांगितले.सदर आरोपीस पुढील कारवाईकरीता चतुःश्रुंगी पोलीस स्टेशन,पुणे शहर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे),श्री.निखिल पिंगळे,मा.सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे-१) श्री. गणेश इंगळे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक १ श्री.नंदकुमार बिडवई,यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक प्रविण काळुखे,पोलीस अंमलदार बाळु गायकवाड,महेश पाटील, साईकुमार कारके,प्रदीप राठोड,धनंजय ताजणे, गणेश ढगे,रविंद्र लोखंडे,श्रीकांत दगडे, शिवाजी सातपुते,अजित शिंदे,गणेश गोसावी,अमित गद्रे, नारायण बनकर, म.पो.अंमलदार मनिषा पुकाळे दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक १, गुन्हे शाखा, पुणे शहर यांनी केली आहे.